*Annexure IX (18), (Vide Article - 9.01 (xxiii))*

**धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास (Critical Wildlife Habitat) तज्ञ समिती स्थापन करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
**शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी -१००७/ प्र.क्र.२७९ /फ-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ११ ऑक्टोबर, २०११

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या क्रमांक १-३९/२००७-WL-I, दि.२५.१०.२००७ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन राज्य शासनाने दि.१४.५.२००८ च्या अधिसूचनेन्वये राज्यस्तरीय तज्ञ समिती गठीत करण्यात आली हाती. या अधिसूचनेनुसार अनुसूचित जमाती आणि पारंपारिक वननिवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ यातील तरतुदीप्रमाणे राष्ट्रीय उद्याने व अभयारण्यांत Critical Wildlife Habitat स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरु होती.

**शासन निर्णय :-**

दरम्यान, केंद्र शासनाने दि.४.५.२०११ अन्वये Critical Wildlife Habitat स्थापन करण्याबाबत नवीन Draft Protocol जाहीर केलेला आहे.

२. या मसुद्याप्रमाणे परिक्षेत्र स्तरावर तज्ञ समिती गठीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. केंद्र शासनाच्या Draft Protocol च्या परिच्छेद क्र.५.१ नुसार, राज्य शासनाने वनसंरक्षक (वन्यजीव) यांना प्राधिकृत केल्यापासून ६० दिवसांच्या आत एक तज्ञ समितीचे गठन करावयाचे आहे. तज्ञ समितीतील अधिकाऱ्यांना प्रत्येक संरक्षित क्षेत्राचे प्रभारी अधिकारी यांनीच त्यांच्या स्तरावर समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्त करावयाचे असल्याने, तशा नियुक्ती करण्यासाठी राज्यातील सर्व संरक्षित क्षेत्राच्या प्रभारी अधिकारी यांना Draft Protocol च्या परिच्छेद क्र.४.१.२ अंतर्गत प्राधिकृत करण्यात येत आहे.

वरील Draft Protocol मधील परिच्छेद ५.१ अनुसार राज्यातील प्रत्येक संरक्षित क्षेत्राच्या प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर खालीलप्रमाणे समिती स्थापन करावी व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे Critical Wildlife Habitat स्थापन करण्याबाबतची कार्यवाही समितीच्या माध्यमातून करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) राष्ट्रीय उद्यान/ अभयारण्याचे प्रभारी अधिकारी | : अध्यक्ष |
| २) संबंधित अपर आदिवासी आयुक्त / प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग | : सह अध्यक्ष |

३) ग्रामसभांचे प्रतिनिधी : सदस्य

४) समाजशास्त्र / मानव वंश शास्त्र या विषयामध्ये पदव्युत्तर स्तरापर्यंत अर्हता प्राप्त असणारा समाजशास्त्र : सदस्य

५) वन्यजीव शास्त्र / ईकॉलॉजीमध्ये पदव्युत्तर स्तरापर्यंत अर्हता प्राप्त असणारा समाजशास्त्रज्ञ : सदस्य

६) आदिवासी कल्याण क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी : सदस्य

७) वन्यप्राणी व वनस्पतीशास्त्राच्या क्षेत्रात काम करणाऱ्या वैज्ञानिक संस्थेचे योग्य अर्हता असणारा प्रतिनिधी : सदस्य

८) स्थानिक पंचायतीचे सदस्य : सदस्य

९) जिल्हा पंचायतीचे सदस्य : सदस्य

१०) संबंधित सहाय्यक वनसंरक्षक किंवा वनक्षेत्रपाल : सदस्य सचिव

सदर समितीतील समाजशास्त्र / मानव वंश शास्त्र या विषयामध्ये पदव्युत्तर स्तरापर्यंत अर्हता प्राप्त असणारा समाजशास्त्रज्ञ तसेच वन्यजीव शास्त्र / ईकॉलॉजीमध्ये पदव्युत्तर स्तरापर्यंत अर्हता प्राप्त असणारा समाजशास्त्रज्ञ यांची नेमणूक प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव ) तथा मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर किंवा प्रधान सचिव (वने) यांच्याशी सल्लामसलत करुन करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजीव गौड)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
राज्यातील सर्व राष्ट्रीय उद्यान / अभयारण्याचे प्रभारी अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्यामार्फत)
सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
अपर आयुक्त, आदिवासी विकास (सर्व)
प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)